# राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प

## जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालया अंतर्गत, अमरावती जिल्ह्यात सन. २००४ पासून इंडस् बालकामगार प्रकल्प व त्यानंतर सन. २००९ पासून राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत ९ ते १४ वर्षे वयोगटातील बालकामगारांसाठी विशेष प्रशिक्षण केंद्र कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. यामध्ये अमरावती महानगर पालिका क्षेत्रामध्ये १६, अमरावती तालुक्यात ०१, अचलपूर ०६, दर्यापूर ०२ भातकुली तालुक्यात ०१, अंजनगॉव सुर्जी ०४, चांदुर बाजार ०१ व वरुड तालुक्यात ०२ केंद्र असे एकुण ३३ विशेष प्रशिक्षण केंद्रांमध्ये १२४९ मुले शिक्षण घेत आहेत. २२ विशेष प्रशिक्षण केंद्रे हे विवीध स्वयंसेवी संस्थे अंतर्गत तर उर्वरीत ११ प्रकल्प कार्यालयाव्दारा संचालीत केल्या जाते. प्रत्येक विशेष प्रशिक्षण केंद्रावर दोन शिक्षक निदेशक, एक पुर्व व्यवसाय मार्गदर्शक, एक मदतनिस तसेच एक सहाय्यक लेखापाल नियुक्त करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील सर्व कार्यरत शिक्षक निदेशक हे डि.एड / बी.एड. तथा तत्सम पात्रता धारक आहे. यांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती यांच्या व्दारे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे, सदर प्रशिक्षण केंद्रे शासन निर्णयानुसार ५ तास चालविण्यात येतात. जिल्ह्यातील सर्व विशेष प्रशिक्षण केंद्रे महानगर पालिका, नगर पालिका, जिल्हा परीषदांच्या शाळेमध्ये सुरू आहेत.

याकरीता जिल्हा स्तरावर कार्यालय असून येथे प्रकल्प संचालक, लेखापाल, क्षेत्रिय अधिकारी - दोन, तज्ञ मार्गदर्शक, लिपीक व शिपाई कार्यरत आहेत.

विशेष प्रशिक्षण केंद्रात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच पुर्व व्यवसाय मार्गदर्शन सुध्दा या केंद्रांच्या माध्यमातुन देण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शालेय पोषन आहार व आरोग्य तपासणी त्यांना दरमहा रु. १५०/- प्रमाणे विद्यावेतन सुध्दा या प्रकल्पा अंतर्गत दिले जाते. केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी योजने अंतर्गत म्हणजेच (Direct Benefited Transfer) या योजने अंतर्गत देशात सर्व प्रथम अमरावती जिल्ह्यातील बालकामगारांना या योजने अंतर्गत मार्च २०१५ पर्यंतचे विद्यावेतन थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे.

या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक तसेच सर्वांगीन विकासासाठी प्रकल्पा अंतर्गत वर्षभर विवीध उपक्रम राबविले जातात. यात सांस्कृतीक कार्यक्रम, मैदानी खेळ तसेच या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी प्रशिक्षण त्यांची आरोग्य तपासणी, बालकामगार या समेस्येबाबत त्यांचे सचेतन आदि उपक्रम वेळोवेळी राबविण्यात येते.

या प्रकल्पा अंतर्गत १२ जुन हा जागतिक बालमजुरी दिना निमित्य सप्ताह साजरा करण्यात येतो. या सप्ताहामध्ये विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये बालमजुरी निर्मुलनासाठी प्रचार व प्रसार हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असतो. यामध्ये लोकल केबल नेटवर्क, फ्लेक्स, पोस्टर्र, बॅनर, पत्रके, रॅली, स्वाक्षरी अभियान आदिच्या मार्फत जिल्हा भर प्रचार प्रसार करण्यात येतो. तसेच १४ नोव्हेंबर या बालदिनाच्या

निमित्याने सुध्दा विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यासाठी विवीध शासकीय विभागाचे तसेच सामाजिक संस्था, लोकप्रतिनीधी, समाजसेवक आदिंचे सहकार्य घेण्यात येते.

प्रकल्पा अंतर्गत आज पर्यंत ३३८१ बालकामगार मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणलेले आहे.

**किरण गित्ते**
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प
अमरावती

**राजेश गुल्हाने**
सहा. कामगार आयुक्त
अमरावती

**प्रविण येवतीकर**
प्रकल्प संचालक
राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प
अमरावती